| संच | C |
|---|---|

# कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व
## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय
## गट क भरतीच्या लेखी परीक्षेसाठी प्रश्नपुस्तिका
## मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बुद्धिमापन चाचणी
## (पदवी स्तर)

| प्रश्नपत्रिका क्र. | 204391 |
|---|---|

परीक्षा दिनांक : २२/११/२०१५

वेळ : ०३.३० ते ०५.०० (९० मिनिटे)

| एकूण प्रश्न | १०० |
|---|---|
| सत्र : | ३ रे |

| एकूण पृष्ठे | १६ |
|---|---|

## सूचना

1. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापुर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.
2. आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

3. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**
4. या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना A, B, C आणि D असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करुन दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.
**ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**
5. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.
6. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.
7. **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्याय उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा करण्यात येणार नाहीत".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विभागाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका विभागाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत / प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि / किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती विभागाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीय वृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पृष्ठावर पहा

https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

## कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

## भाग - 1 : मराठी

1. 'चंचल' या शब्दातील अनुस्वाराचा उच्चार कोणत्या अनुनासिका सारखा होतो ?

(A) ङ् (B) ञ् (C) ण् (D) न्

2. 'मतैक्य' हा शब्द कोणते दोन शब्द एकत्र येऊन तयार होतो ?

(A) मत + एक (B) मत + ऐक्य

(C) मत + एक्य (D) मत् + एक

3. स्त्रीलिंगीरूप स्वतंत्रपणे होणाऱ्या शब्दाचा पर्याय कोणता ?

(A) कुत्रा (B) बोका (C) बेडूक (D) चिमणा

4. 'युगांतर' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(A) शिवाजी सावंत (B) शिवाजीराव भोसले

(C) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (D) यशवंतराव चव्हाण

5. 'अनंत' या सामासिक शब्दाचा योग्य अर्थ / विग्रह कोणता ?

(A) नाही अंत ज्याला तो (B) जे अंतिम नाही असे ते

(C) अंतरिम असलेला (D) आत्म्याचे ज्ञान

6. खालील वाक्याचा प्रकार कोणता ?

'आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो.'

(A) केवल वाक्य (B) मिश्र वाक्य (C) संयुक्त वाक्य (D) विकल्प बोधक वाक्य

7. 'अज्ञ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(A) सुज्ञ (B) ज्ञान (C) विद्या (D) विद्‌वान

8. खालील पर्यायांतील भावे प्रयोगाचे वाक्य कोणते ?

(A) सचिन क्रिकेट खेळतो. (B) नफिसाने काकडी खाल्ली.

(C) अनिशने गाणे म्हटले. (D) आईने मला खुणवले.

9. समानार्थी शब्दांच्या दृष्टीने गटात न बसणारा पर्याय कोणती ?

(A) मित्र (B) भानू (C) सविता (D) सुधाकर



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

*सूचना : उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्न सोडवा :* **(प्रश्न-क्रमांक 10 से 12)**

माणसे पैशांचा जमाखर्च ठेवतात. खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतात, मात्र वेळेच्या बाबतीत हा विवेक दाखवत नाहीत. पैसा हा खर्च होतो, तसाच तो मिळतही राहतो. प्रसंगी पैसा उसना घेता येतो, परत करता येतो, शिल्लक ठेवता येतो; पण वेळेच्या बाबतीत अशी अनुकूलता अनुभवता येत नाही. गेला क्षण जातो, तो परत येत नाही. तो कोणाकडून मागून घेता येत नाही. गेलेले आयुष्यही परत मिळत नाही. काळ हा असा एकमार्गी असतो हे विचारात घेऊन विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी आलेल्या प्रत्येक क्षणाचा उपयोग केला पाहिजे. वेळ कारणी लावला पाहिजे. जे केलेच पाहिजे, ते वेळेअभावी करता आले नाही, अशी हळहळ व्यक्त करण्याची वेळ जीवनात यावी का ? वेळेचे गणित मांडून पाहावे.

**10.** वेळेअभावी जीवनात काय होते ?

(A) व्यर्थ जाणे.
(B) हळहळ व्यक्त करणे.
(C) पैसा वाया जाणे.
(D) प्रतिकूलता अनुभवणे.

**11.** खालील पर्यायांपैकी उताऱ्यासाठी सर्वाधिक समर्पक शीर्षक कोणते ?

(A) जमाखर्च पैशाचा
(B) जीवनाचे अंदाजपत्रक
(C) वेळेचे माहात्म्य
(D) आयुष्याचे गणित

**12.** जीवनात कोणती गोष्ट परत मिळविता येणार नाही ?

(A) पैसा
(B) विवेक
(C) अनुकूलता
(D) वेळ

**13.** 'बाईंना वह्या वर्गात आणवत नाहीत.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार कोणता ?

(A) शक्य क्रियापद
(B) प्रयोजक क्रियापद
(C) साधित क्रियापद
(D) अनियमित क्रियापद

**14.** खालील पर्यायातील वाक्प्रचार आणि त्याचा अर्थ यांची चुकीची जोडी कोणती ?

(A) संगती लागणे - उलगडा होणे
(B) विडा उचलणे - प्रतिज्ञा करणे
(C) आभाळाला कवेत घेणे - आभाळगत मायाकरणे
(D) कणीक तिंबणे - मार देणे

**15.** 'कोठेही गेले तरी मनुष्य स्वभाव सारखाच' हा अर्थ कोणत्या म्हणीतून स्पष्ट होतो ?

(A) खाण तशी माती
(B) पळसाला पाने तीनच
(C) कोळसा उगळवा तितका काळाच
(D) मुलाचे पाय पाळण्यात दिसतात



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

16. खालीलपैकी अभ्यस्त शब्द कोणते ?

(अ) शेजारीपाजारी

(ब) घरघर

(क) हळूहळू

(A) फक्त 'अ' आणि 'ब'
(B) फक्त 'ब' आणि 'क'
(C) फक्त 'क' आणि 'अ'
(D) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'

17. 'हालअपेष्टा सहन करण्याचा गुण' यासाठी योग्य समूहदर्शक शब्द कोणती ?

(A) सहिष्णू (B) विजूगिषी (C) तितिक्षा (D) कष्टाळू

18. कार्यालयीन पत्रलेखनातील मान्यात समाविष्ट नसणारा भाग खालील पर्यायांपैकी कोणता ?

(A) पत्र पाठविणाऱ्याचा पत्ता

(B) पत्र पाठविणाऱ्याचे नाव

(C) पत्रातील मजकूर

(D) ज्याला पत्र पाठवायचे आहे-त्या व्यक्तीचे संबोधन

19. खालील पर्यायांपैकी भाववाचक नाम कोणते ?

(A) गोड (B) आशा (C) श्रीमंती (D) शांत

20. खालील वाक्यातील काळ कोणता ?

*'मी निबंध लिहीत होता.*

(A) अपूर्ण भूतकाळ
(B) रीती भूतकाळ
(C) पूर्ण वर्तमानकाळ
(D) साधा भूतकाळ

21. 'शिक्षकांनी <u>मुलांना</u> शाबासकी दिली.' या वाक्यातील अधोरेखित शब्दांचे सामान्यरुप कोणते ?

(A) मुल (B) मूल (C) मुलां (D) मुला

22. खालील पर्यायांपैकी शुद्ध शब्द कोणता ?

(A) आशिर्वाद (B) आशीर्वाद (C) आर्शिवाद (D) आर्शीवाद

23. 'साहेब, मालक, जाहिर' हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत रूढ झाले आहेत ?

(A) अरबी (B) पोर्तुगीज (C) फारसी (D) हिंदी

24. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात कोणती ?

'पक्षी झाडा<u>वर</u> बसतो.'

(A) क्रियापद (B) शब्दयोगी अव्यय (C) नाम (D) उभयान्वयी अव्यय

25. निश्चितपर्ण अनेकवचनी शब्दाचा पर्याय कोणता ?

(A) माळा (B) शाळा (C) वाळा (D) कळा



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**26.** Choose the correct alternative :

*'It is the most fertile region.'*

(1) No other region is as fertile as it.

(2) It is more fertile than any other region.

(A) Only 1 is correct
(B) Only 2 is correct
(C) Both 1 and 2 are correct
(D) Both are incorrect

**27.** Choose the 'Grammatically Wrong' sentence :

(A) He is employed with a factory.
(B) Kashmir is celebrated for its scenery.
(C) I am convinced of my error.
(D) His betrayal was fatal to our plans.

**28.** Choose the word Opposite in meaning to the given word :

*'Banish'*

(A) Abandon
(B) Harbour
(C) Intrude
(D) Drop

**29.** Choose the one which best expresses the given sentence in 'Passive Voice' :

*'Where will you purchase the dictionary ?'*

(A) Where will you be purchased by you ?

(B) Where will the dictionary be purchased by you ?

(C) Where will be purchased the dictionary by you ?

(D) Where will the dictionary be purchased by you ?

**30.** Choose the one which best expresses the given sentence in 'Indirect Speech' :

*He said to me, "May you live long !"*

(A) He prayed that might I live long.

(B) He prayed that I might live long !

(C) He prayed that I might live long.

(D) He prayed that I may live long.

**31.** Name the figure of speech in the following line :

*'We read Shakespeare.'*

(A) Synecdoche
(B) Simile
(C) Metaphor
(D) Metonymy



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

*Read the following extract and answer the questions by selecting the most appropriate answer :*
**[Q. Nos. 32 to 36]**

Break, break, break,
On thy cold gray stones, O Sea !
And I would that my tongue could utter
The thoughts that arise in me.
O, well for the fisherman's boy,
That he shouts with his sister at play !
O, well for the sailor lad,
That he sings in his boat on the bay !
And the stately ships go on
To their haven under the hill;
But O for the touch of a vanished hand,
And the sound of a voice that is still !
Break, break, break,
At the foot of thy crags, O Sea !
But the tender grace of a day that is dead
Will never come back to me.

**32.** The phrase 'my tongue could utter' means :

(A) tongue was paralysed
(B) he could not express his grief
(C) if he could express his grief
(D) none of the above

**33.** The poet has depicted a picture of permanent objects in contrast with :

(A) fleeting objects
(B) temporary nature
(C) divinity
(D) temporariness of life

**34.** The images that are more abiding than the life of man are :

(A) fisherman's boy's singing
(B) the boy at play
(C) the coming of grand ships
(D) all of the above

**35.** The poet yearns for the company of someone who :

(A) was close to him
(B) could help him
(C) has departed
(D) both (A) and (C)

**36.** The waves of the sea are constantly :

(A) in pain
(B) rising
(C) striking against cold gray stones
(D) flowing



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**37.** Choose the one which expresses the meaning of the given idiom :

*'To strike one's colours.'*

(A) To fight vigorously (B) To work hard

(C) To surrender (D) To make a rude gesture

**38.** Choose the one which best expresses the meaning of the given word :

*'Gripe'*

(A) Complaint (B) Journey (C) Resentment (D) Satisfaction

**39.** Choose the most suitable alternative :

*Sudhir's behaviour is worthy of .................*

*............... by all youngsters.*

(A) trial (B) emulation (C) exploration (D) following

*In the following passage, there are blanks, each of them has been numbered. The appropriate alternative has been mentioned against the number given below :* **[Q. No. 40 to 44]**

The appointed day has come, and India stands **40** again, after long **41** and struggle, awake, vital, free and independent. The past **42** on to us still in some **43** and we have to do much before we **44** our pledges.

**40.** (A) here (B) free (C) forth (D) forward

**41.** (A) period (B) slumber (C) compulsion (D) exile

**42.** (A) sticks (B) faces (C) extends (D) clings

**43.** (A) measure (B) quantity (C) limits (D) ways

**44.** (A) take (B) redeem (C) rectify (D) comply

**45.** Choose the correct 'Preposition' :

*The report did not find favour ............. the shareholders.*

(A) of (B) with (C) by (D) to

**46.** Choose the appropriate alternative !

*............. number of important points were raised in the course of ............ discussion.*

(A) A, the (B) The, the (C) The, a (D) A, no article

**47.** Find out which part has an error :

*Two-thirds of the book / were / rubbish / No error.*

1 2 3 4

(A) 1 (B) 2 (C) 3 (D) 4



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

48. Choose the correctly spelt word :

(A) Farenheit (B) Faranhiet

(C) Farenhiet (D) Fahrenheit

49. Choose the most suitable 'One-word' for the given expression :

*'Clumsy or ill-bred fellow.'*

(A) Boor (B) Oaf (C) Lout (D) Yokel

50. Choose the appropriate alternative :

*After I .............. the news, I hurried to see her.*

(A) heard (B) hear

(C) had heard (D) have heard

## भाग - 3 : सामान्य ज्ञान

51. छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे स्वामीनिष्ठ सेवक यांचा अयोग्य पर्याय कोणता ?

(A) आरमार दलातील महत्वाचा अधिकारी - सिद्दी मिसरी

(B) अफझलखानाच्या भेटीच्या वेळी सैन्यातील विश्वासू सेवक - सिद्दी इब्राहिम.

(C) सैन्यातील सरदार - सिद्दी हिलाल.

(D) पन्हाळ्याच्या वेढयाच्या वेळी बाजीप्रभूचा सहकारी - सिद्दी मसऊद

52. भारतातील पहिल्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?

(A) पी. सी. महालनोबीस (B) के. सी. नियोगी

(C) के. संथानम् (D) धनंजयराव गाडगीळ

53. राजस्थानातील पिण्याचे पाणी साठविण्यासाठी सुबक पद्धतीने बांधण्यात येणाऱ्या छोट्या टाक्या कोणत्या नावाने प्रसिद्ध आहेत ?

(A) जोहड (B) कुई (C) खादिन (D) टंका

54. 'लोकपाल' ही संकल्पना कोणत्या देशात सर्वप्रथम वापरली गेली ?

(A) नॉर्वे (B) स्वीडन (C) जपान (D) अमेरिका

55. 'आकाशाचा रंग निळा दिसणे' हे कशाचे उदाहरण आहे ?

(A) प्रकाशाचे अपवर्तन (B) प्रकाशाचे अपस्करण

(C) प्रकाशाचे परावर्तन (D) प्रकाशाचे विकिरण



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

56. ग्रीक संस्कृतीशी संबंधित विसंगत विधान खालील पर्यायांपैकी कोणते ?

(A) ग्रीक संस्कृतीने जगाला प्रत्यक्ष लोकशाहीची देणगी दिली.

(B) ग्रीकांनी इहवादी तत्त्वज्ञानाचा पाया घातला.

(C) वैशिष्ट्यपूर्ण नाणी तयार करण्याची कल्पना ग्रीकांनी भारतीयांपासून घेतली.

(D) सिकंदराच्या स्वारीनंतर भारत व ग्रीस देशातील दळणवळण वाढले.

57. 'जागतिक आदिवासी दिन' कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?

(A) 29 जून (B) 28 नोव्हेंबर (C) 8 मार्च (D) 9 ऑगस्ट

58. खालीलपैकी निमलष्करी दले कोणती ?

(अ) केंद्रीय राखीव पोलीस दल

(ब) भारतीय तटरक्षक दल

(क) गतिमान कृती दल

(A) फक्त 'अ' आणि 'ब' (B) फक्त 'ब' आणि 'क'

(C) फक्त 'क' आणि 'अ' (D) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'

59. भारताच्या शेजारील देशांपैकी लांबीच्या दृष्टीने सर्वात जास्त व सर्वात कमी सलग्न भूसीमा असणाऱ्या देशांची योग्य जोडी कोणती ?

(A) बांग्लादेश व भूतान (B) बांग्लादेश व अफगाणिस्तान

(C) चीन व भूतान (D) चीन व अफगाणिस्तान

60. पंडिता रमाबाई यांच्याशी संबंधित नसलेली संस्था कोणती ?

(A) कृपासदन (B) सेवासदन (C) शारदासदन (D) मुक्तीसदन

61. खालील पर्यायांपैकी सूर्यमालेतील कोणत्या ग्रहाभोवती कडी आहे ?

(A) युरेनस (B) शुक्र (C) बुध (D) मंगळ

62. विधान परिषद सदस्यांशी संबंधित योग्य बाब खालील पर्यायांपैकी कोणती ?

(A) विधान परिषद सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो.

(B) विधान परिषद सदस्य होण्यासाठी किमान 35 वर्षे पूर्ण असावे लागते.

(C) विधान परिषदेतील काही सदस्यांची निवड राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांमार्फत होते.

(D) विधान परिषदेतील सदस्य विधानसभेतील काही सदस्य निवडून देतात.



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

63. खालील पर्यायांपैकी कोणता प्राणी आपल्या शरीराचे तापमान वातावरणाच्या तापमानानुसार बदलतो ?

(A) कांगारू (B) बेडूक (C) माकड (D) वटवाघूळ

64. पश्चिम घाटातील सर्वाधिक उंचीचे शिखर कोणते ?

(A) अन्नाईमुडी (B) दोडाबेट्टा (C) मलयगिरी (D) कळसूबाई

65. दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेमध्ये (सार्क) समाविष्ट नसलेला देश कोणता ?

(A) भूतान (B) मालदीव

(C) अफगाणिस्तान (D) इंडोनेशिया

66. स्वातंत्र्यपूर्व काळात गुप्तपणे सशस्त्र क्रांतिकारी चळवळीत भाग घेणाऱ्या महाराष्ट्रातील संघटनांची जोडी दर्शविणारा पर्याय कोणता ?

(A) आर्य बांधव समाज आणि शिवाजी क्लब

(B) अभिनव भारत संघटना आणि बॉम्बे असोसिएशन

(C) मित्रमेळा आणि अनुशीलन समिती

(D) प्रेसिडेन्सी क्लब आणि इंडिया हाऊस

67. भारत सरकारकडून दिला जाणारा 'भारतरत्न' हा पुरस्कार प्राप्त महाराष्ट्रीयन व्यक्ती कोण ?

(A) जमशेदजी टाटा (B) जगन्नाथ शंकरशेठ

(C) वि. स. खांडेकर (D) गोविंद वल्लभ पंत

68. पृथ्वीवरील जमिनीपैकी सर्वसाधारणपणे पर्वतांनी व्यापलेला भाग किती ?

(A) 17% (B) 15% (C) 11% (D) 9%

69. खालील पर्यायांपैकी 'बॉक्सिंग (मुष्टी युद्ध)' या क्रीडाप्रकाराशी संबंधित राष्ट्रीय खेळाडू कोणता ?

(A) सुशीलकुमार (B) विजयकुमार

(C) मनोजकुमार (D) वीरधवलकुमार

70. फ्रेंच विचारवंत रुसो यांचा प्रसिद्ध ग्रंथ कोणता ?

(A) कॅन्डिड (B) द स्पिरीट ऑफ लॉज्

(C) राइटस् ऑफ मॅन (D) एमिल

71. 'रायबोफ्लेविन' म्हणजे कोणते जीवनसत्त्व ?

(A) अ (B) ब (C) क (D) ड



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

72. 'अधातू' हे सर्वसाधारणपणे उष्णतेचे ________ व विजेचे ________ असतात.

(A) सुवाहक, सुवाहक (B) सुवाहक, दुर्वाहक

(C) दुर्वाहक, दुर्वाहक (D) दुर्वाहक, सुवाहक

73. ग्रॅफाईटचे उपयोग खालीलपैकी कोणते ?

(अ) इलेक्ट्रोडस बनविणे

(ब) वंगण बनविणे

(क) कार्बनच्या कांडया बनविणे

(A) फक्त 'अ' आणि 'ब' (B) फक्त 'ब' आणि 'क'

(C) फक्त 'क' आणि 'अ' (D) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'

74. 'लोकसंख्येची घनता' ही संकल्पना स्पष्ट करणारे विधान दर्शविणारा पर्याय कोणता ?

(A) मानव व जमीन यांचे एखाद्या प्रदेशातील गुणोत्तर.

(B) मानव व उपलब्ध घरे यांचे एखाद्या प्रदेशातील गुणोत्तर.

(C) दर शेकडा चौ.कि.मी. प्रदेशात राहणारी लोकांची संख्या.

(D) दर हेक्टर प्रदेशात राहणारी लोकांची संख्या.

75. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाने कोणत्या राष्ट्रीय उद्यानाच्या 'बफरझोन' मधील कोळशाचे उत्खनन करण्यास परवानगी नाकारण्यात आलेली आहे ?

(A) पेंच (B) नवेगावबांध (C) ताडोबा (D) गुगामल

## भाग - 4 : बुद्धिमत्ता चाचणी

76. विधानांवरून खालीलपैकी निश्चितपणे योग्य अनुमान/अनुमाने कोणते/कोणती ?

विधाने : (1) काही मणी हिरवे आहेत.

(2) सर्व पोपट हिरवे आहेत

अनुमान :(अ) काही पोपट मणी आहेत.

(ब) काही मणी पोपट आहेत.

(A) फक्त 'अ' (B) फक्त 'ब'

(C) दोन्ही 'अ' आणि 'ब' (D) 'अ' आणि 'ब' दोन्ही नाहीत.



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

*सूचना : खालील प्रश्नातील विसंगत पदाचा पर्याय ओळखा :* **[प्रश्न-क्रमांक 77 ते 78]**

**77.** (A) 286 (B) 430 (C) 308 (D) 462

**78.** (A) 264 (B) 684 (C) 246 (D) 648

**79.** एके वर्षी नाताळचा सण रविवारी होता. यावरून त्याच वर्षातील महाराष्ट्र दिनाचा वार कोणता असेल ?

(A) सोमवार (B) रविवार (C) शनिवार (D) शुक्रवार

**80.** रिकाम्या जागी असणाऱ्या अंकांचा गट दर्शविणारा पर्याय कोणता ?

11 _ 110 _ 111 _ 110 _ 1

(A) 1111 (B) 1001 (C) 0101 (D) 0110

**81.** चौकटीतील प्रश्नचिन्हाच्या जागी असणारे पद कोणते ?

| | | |
|---|---|---|
| 8 | ? | 82 |
| 13 | 5 | 97 |
| 6 | 12 | 90 |

(A) 11 (B) 13 (C) 9 (D) 10

**82.** HRJ : LNN : : PJR : ?

(A) UEW (B) GUE (C) TFV (D) EVT

*सूचना : खालील प्रश्नांतील विसंगत पदाचा पर्याय ओळखा :* **[प्रश्न-क्रमांक 83 ते 84]**

**83.** (A) सलिल (B) अभी (C) जीवन (D) अंबू


**84.** (A) PTR (B) FJH (C) KNL (D) UYW

**85.** रिकाम्या जागी असणाऱ्या अक्षरांचा गट दर्शविणारा पर्याय कोणता ?

p – qrsp – qrs – qrr – pqr – s

(A) pqqsr (B) qqqsr (C) qqpss (D) pqpss

**86.** दिलेल्या माहितीशी सुसंगत असणाऱ्या वेन आकृतीचा पर्याय कोणता ?
तामिळनाडू, मदुराई, भारत




(A) (B) (C) (D)




https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**87.** खालील घनाकृतीच्या प्रत्येक पृष्ठावर एक याप्रमाणे 1 ते 6 अंक लिहिलेले आहेत, यावरून '2' च्या विरुद्ध पृष्ठावर कोणता अंक असेल ?




(A) 6 (B) 4 (C) 1 (D) 3

**88.** प्रश्नचिन्हाच्या जागी असणारे पद कोणते ?





(A) 40 (B) 30 (C) 70 (D) 60

**89.** एका सांकेतिक भाषेत FUN = 114127 आणि DOG = 72913 असेल; तर RAT = किती ?

(A) 37141 (B) 35139 (C) 37339 (D) 35141

**90.** शेजारील आकृतीतील चौकोनांची संख्या किती ?



(A) 6 (B) 5 (C) 8 (D) 7

**91.** 24, 30, 33, 39, 51, ?

(A) 61 (B) 59 (C) 57 (D) 54

*सूचना : समान संबंध ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी असणारे पद ओळखा :* **[प्रश्न-क्रमांक 92 ते 93]**

**92.** 230 : 251 : : 126 : ?

(A) 293 (B) 260 (C) 284 (D) 139

**93.** 12 : 72 : : ? : 242

(A) 22 (B) 32 (C) 24 (D) 34

**94.** 12 : 20 वाजता आणी 4 : 40 वाजता घड्याळात मिनिटकाटा व तासकाटा यांच्यात होणाऱ्या कोनातील फरक किती ?

(A) 20° (B) 10° (C) 15° (D) 5°



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

95. UFW, RIT, OLQ, LON, ?


(A) HSJ (B) RPS (C) IRK (D) JQL


96. त्रिकोण : बाजू : : रेषाखंड : ?

(A) चौकोन (B) किरण (C) बिंदू (D) प्रतल

97. 92, 74, 46, 22, 18, ?

(A) 10 (B) 9 (C) 12 (D) 11


98. 




(A) (B) (C) (D)

99. एका सांकेतिक WORLD = XNSKE आणि BASKET = CZTJFS असे लिहितात, तर RIGHT = ?

(A) SHHGU (B) SIHIV (C) QHFGS (D) QJFIS

100. 



(A) (B) (C) (D)



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**सूचना : (पृष्ठ 1 वरुन पुढे...)**

8. प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरीक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्येशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनयम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.
9. सदर प्रश्नपत्रिकेसाठी विभागाच्या विहित केलेली वेळ संपल्यानंतर वा संपण्यापुर्वी उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी नाही. **परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपली प्रश्नपुस्तिका व आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-१ (विभागाची प्रत) पर्यवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

**नमूना प्रश्न :**

प्र.क्र. 101 "तितिक्षा" या शब्दासाठी योग्य शब्दसमूह कोणता ?

(A) केलेले उपकार जाणणारा.
(B) हाल अपेष्टा सहन करण्याचा गुण.
(C) केलेले उपकार न जाणणारा.
(D) जाणून घेण्याची इच्छा असणारा.

या प्रश्नाचे योग्य उत्तर "(B) हालअपेष्टा सहन करण्याचा गुण" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(B)" होईल यास्तव खालील प्रमाणे प्रश्न क्र. 101 मधील उत्तर क्र. "Ⓑ" हे वर्तुळ पुर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

○ ● ○ ○        ⊘ ⊗ ⦿ ◐

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरली त्या-त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पुर्णपणे छायांकित करुन दाखवावा. हयाकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/